**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**शनिवार दिनांक ३० मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **देशाचे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान सेवानिवृत्त, लेफ्टनंट जनरल एन.एस.राजा सुब्रमणी पदभार स्वीकारणार.**
2. **नागपूरच्या भांडेवाडीतील सीबीजी प्रकल्पाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली पाहणी.**
3. **यवतमाळ मध्ये हवामान अनुकूल कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करणाऱ्या शेतकरी गटांसाठी 'फार्मर ग्रुप लीग' स्पर्धेचे आयोजन.**
4. **येत्या दोन जून पर्यंत विदर्भाच्या अनेक जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा इशारा, नागपुरात आज पावसाची हजेरी.**

--------------------------------------------

उपेंद्र द्विवेदी

ऑपरेशन सिंदूरने भारताची कोणत्याही चिथावणीखोर कारवाईला अचूक आणि ठाम प्रत्युत्तर देण्याची क्षमता सिद्ध केली असून, नव्या सुरक्षा आव्हानांना प्रतिसाद देण्यासाठी एक नवा मापदंड निर्माण केला आहे, असे प्रतिपादन लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी केलं आहे. पुण्यातील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी अर्थात एनडीएच्या १५० व्या अभ्यासक्रमाच्या पासिंग आऊट परेडला संबोधित करताना आज ते बोलत होते. ऑपरेशन सिंदूर हे राष्ट्राच्या दृढ इच्छाशक्तीचं प्रतीक असून, तिन्ही सैन्यदलांमधील समन्वयाचं महत्त्व अधोरेखित करत असल्याचंही यावेळी त्यांनी सांगितलं. पदवीधर कॅडेट्सनी व्यावसायिकता, नेतृत्व आणि राष्ट्रसेवेची सर्वोच्च मूल्यं जपावीत, असं आवाहन त्यांनी केलं.

--------------------------------------------

अनिल चौहान

देशाचे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान आज सेवानिवृत्त झाले. देशाचे सर्वोच्च सैन्य अधिकारीपदाच्या त्यांच्या कार्यकाळाच्या समाप्तीचं प्रतीक म्हणून, नवी दिल्लीतल्या राष्ट्रीय युद्ध स्मारक इथं तिन्ही दलांनी त्यांना गार्ड ऑफ ऑनर दिला. यानंतर चौहान यांनी युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण केलं. तिन्ही

दलांच्या गार्ड ऑफ ऑनरनं सेवानिवृत्त होणं ही आपल्यासाठी सन्मानाची बाब असल्याची भावना चौहान यांनी यावेळी व्यक्त केली. आपला कार्यकाळ समाधानकारक आणि उत्कृष्ट असल्याचंही ते म्हणाले. चौहान हे १९८१ मध्ये भारतीय लष्करात रुजु झाले होते, त्यांनी ४० वर्षांपेक्षा जास्त काळ लष्करात सेवा दिली. या कार्यकाळात त्यांनी अनेक महत्त्वाच्या पदांची जबाबदारी सांभाळली. त्यांच्या सेवेसाठी त्यांना परम विशिष्ट सेवा पदकासह अनेक पदकांनी सन्मानितही केलं गेलं. चौहान यांच्यानंतर लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी हे देशाचे नवे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ म्हणून पदभार स्वीकारणार आहेत.

--------------------------------------------

मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरून 'मन की बात'च्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधणार आहे हा कार्यक्रम सकाळी 11 वाजता प्रसारित होईल.

--------------------------------------------

देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूरच्या भांडेवाडी येथे उभारण्यात आलेल्या देशातील पहिल्या 'ड्राय डायजेशन' आधारित सीबीजी (कॉम्प्रेस्ड बायोगॅस) प्रकल्पाची पाहणी केली. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे  आणि महापौर नीता ठाकरे यांची  प्रमुख उपस्थित होते. ३०० कोटी रुपयांच्या खाजगी गुंतवणुकीतून उभारण्यात आलेला हा प्रकल्प ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार असून  या माध्यमांतून वेस्ट तो वेल्थ जनरेशन होत असल्याचे फडणवीस यावेळी म्हणाले-

***(होल्ड बाईट- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ४४ सेकंद)***

भांडेवाडीतील दुर्गंधीचा प्रश्न पुढील तीन ते चार महिन्यांत संपुष्टात येईल, तर वर्षभरात कचऱ्याचे ढिगारे हटवून परिसर डम्पिंगमुक्त करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले. मनपा आयुक्त डॉ विपीन  यांनी पुढील दोन वर्षांत नागपूरला डम्पिंगमुक्त शहर बनविण्याचा मानस व्यक्त केला.

--------------------------------------------

साहेबराव कांबळे

यवतमाळ विधान परिषद निवडणूकिसाठी काँग्रेसचे साहेबराव कांबळे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे, सोमवारी ते महाविकास आघाडीकडून काँग्रेसचा अधिकृत अर्ज दाखल करतील. 446 पैकी महाविकास आघाडीकडे 195 चे संख्याबळ आहे, परंतु आपण स्थानिक चे उमेदवार असल्याने आणि निवडणूक ही गोपनीय

असल्याने विजय आपल्याच पारड्यात येईल असा दावा साहेबराव कांबळे यांनी केला. साहेबराव कांबळे हे कॉग्रेस चे प्रदेश सरचिटणीस असून त्यांनी २०२४ मध्ये उमरखेड विधानसभा मतदारसंघात काँग्रेस कडून निवडणूक लढवली होती मात्र त्यांचा भाजप उमेदवाराने पराभव केला होता. कांबळे यांच्या विरोधात महायुती कडून कोणाला उमेदवारी मिळते याकडे लक्ष लागले आहे.

---------------------------------------------

अशोक उईके

महाराष्ट्राचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी आज लोककल्याण डायग्नोस्टिक्सला भेट देऊन 'प्रोजेक्ट सुश्रुत' या सिकल सेल आणि थॅलेसेमिया प्रतिबंध कार्यक्रमाचा आढावा घेतला. गेल्या तीन वर्षांत या प्रकल्पाअंतर्गत सुमारे 1 लाख 15 हजार व्यक्तींची तपासणी करण्यात आली असून 6.5 ते 7 टक्के लक्षणविरहित वाहक आढळले आहेत. मंत्री उईके यांनी या उपक्रमाचे कौतुक करत शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले

---------------------------------------------

प्राजक्त तनपुरे

राज्याचे माजी राज्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी आज भाजपात प्रवेश केला. मुंबईती भाजप प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या उपस्थितीत तनपुरे यांच्या भाजप प्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. प्राजक्त तनपुरे यांचा भाजप प्रवेश हा शरद पवार यांच्या पक्षाला मोठा धक्का मानला जात आहे. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे वरिष्ठ नेते जयंत पाटील यांचे प्राजक्त तनपुरे हे भाचे आहेत. तनपुरे यांच्यासह त्यांच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला आहे. प्राजक्त तनपुरे यांच्यासारखा एक तरुण आणि अभ्यासू कार्यकर्ता आज भाजपसोबत जोडला गेला आहे, असं सांगत प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी त्यांचं भाजपात स्वागत केलं. दरम्यान, प्राजक्त तनपुरे यांच्या पक्षप्रवेशाबद्दल त्यांचे मामा जयंत पाटील यांना विचारलं असता तनपुरे यांचा प्रवेश करणं धक्कादायक असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. मात्र त्यांनी मतदारसंघाची परिस्थिती लक्षात घेऊन हा निर्णय घेतला असावा असंही ते म्हणाले.

---------------------------------------------

'फार्मर ग्रुप लीग'

यवतमाळ जिल्हा प्रशासन, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय आणि आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अनुकूल कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करणाऱ्या शेतकरी गटांसाठी 'फार्मर ग्रुप लीग' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा 10 जून ते 10 ऑगस्ट 2026 या कालावधीत होणार असून शेतकरी गटांच्या विविध कृषी उपक्रमांवर गुणांकन केले जाणार आहे. स्पर्धेत मृदा व बीज व्यवस्थापन, पीक पद्धती व शेती तंत्रज्ञान, जैविक निविष्ठा व कीड-रोग व्यवस्थापन तसेच क्षमता बांधणी व तंत्रज्ञान वापर अशा चार टप्प्यांमध्ये मूल्यांकन होणार आहे. चारही स्तर यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विजेत्या गटांचा 15 ऑगस्ट रोजी प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार असून त्यांना राज्य, आंतरराज्य आणि जिल्हास्तरीय अभ्यास दौऱ्याची संधी मिळणार आहे. महाविस्तार ॲप आणि सोशल मीडियाद्वारे कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करणाऱ्या गटांना 10 गुणांचा विशेष बोनस दिला जाणार आहे. या स्पर्धेसाठी नोंदणी 10 जूनपर्यंत गुगल फॉर्मद्वारे किंवा संबंधित गावाच्या सहायक कृषी अधिकाऱ्यांकडे करता येणार आहे. प्रत्येक गावातून किमान एक शेतकरी गट सहभागी होणे आवश्यक असून एका गटात 10 ते 20 सदस्य असणे बंधनकारक आहे.

---------------------------------------------

"हरित आणि शाश्वत रेल्वे संचालन"

जागतिक पर्यावरण दिन २०२६ निमित्त दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात काल आणि आज  मे रोजी "हरित आणि शाश्वत रेल्वे संचालन" विषयावर विशेष जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. मंडल रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण संरक्षण, ई-कचरा व्यवस्थापन, कापडी पिशव्यांचा वापर आणि पेपरलेस तिकीट प्रणालीला प्रोत्साहन देणारे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. रेल्वे स्थानकांवर यूटीएस मोबाईल ॲपद्वारे डिजिटल तिकीट बुकिंगबाबत प्रवाशांना मार्गदर्शन करण्यात येत असून स्वच्छ, हरित आणि शाश्वत भविष्यासाठी जनजागृती केली जात आहे.

---------------------------------------------

टीबी

क्षयरोग हा पूर्णपणे बरा होतो. क्षयरोगाप्रती समाजामध्ये असलेले भेदभाव दूर करणे व त्यांना शासकीय सोयीसुविधा उपलब्ध करून देणे, तसेच क्षयरुग्णांना आवश्यक औषधोपचार करून क्षयमुक्त करणे, या उद्देशाने चंद्रपूरचे  जिल्हाधिकारी वसुमना

पंत यांनी क्षयरोग दूरीकरण मोहिमेचा आढावा घेतला. सद्यस्थितीत जिल्ह्यात एकूण 905 रुग्णांवर योग्यरित्या उपचार सुरू असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

--------------------------------------------

संत्रा उत्पादक

बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यात अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सोनाळा, सायखेड आणि पिंगळी परिसरातील सुमारे ८०० हेक्टरवरील संत्रा बागा बाधित झाल्या असून 'आंबिया बहार' आणि 'मृग बहार' हे दोन्ही हंगाम उद्ध्वस्त झाले आहेत.गारपिटीमुळे झाडांवरील सुमारे ९० टक्के फळे गळून पडली असून अनेक झाडांच्या फांद्या तुटल्या, तर काही झाडे मुळासकट उन्मळून पडली आहेत. यामुळे पुढील दोन ते तीन वर्षे उत्पादनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.सोनाळा गावातील सुमारे ७० टक्के क्षेत्र संत्रा लागवडीखाली असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी शासनाकडे हेक्टरी एक लाख रुपयांची मदत देण्याची मागणी केली आहे.

--------------------------------------------

हवामान

आगामी दोन जून पर्यंत विदर्भाच्या अनेक जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा आणि वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे.आज देखील नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहू शकतं तर वर्धा, यवतमाळ आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये उष्णता कायम राहणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यात आज उष्णतेचा येलो अलर्ट जारी करण्यात आलाय.मागील 24 तासात विदर्भात नागपूर येथे सर्वाधिक 45 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. तर वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम या सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 44 अंश सेल्सिअस ते 45°c दरम्यान आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये देखील तापमान 42 अंश सेल्सिअसच्या पुढे आहे. नागपुरात आज संध्याकाळच्या सुमारास काही ठिकाणी हलक्या पावसाची नोंद करण्यात आली.

--------------------------------------------

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत उद्या होणाऱ्या अंतिम सामन्यात गुजरात टायटन्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात लढत होणार आहे. काल राजस्थान रॉयल्स

विरुद्ध झालेल्या सामन्यात गुजरातच्या संघाने राजस्थानवर ७ गडी राखून विजय मिळवला. राजस्थान रॉयल्सने निर्धारित २० षटकांत ६ गडी गमावून २१६ धावा केल्या होत्या. गुजरातने हे लक्ष्य एकोणिसाव्या षटकातच ७ गडी राखून पूर्ण केलं.

---------------------------------------------